**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक ०२ जानेवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **महानगरपालिका निवडणुकीसाठी माघारीची मुदत समाप्त, अनेक ठिकाणी उमेदवारांच्या बिनविरोध निवडी निश्चित.**
2. **महाराष्ट्रासह ८ राज्यात सेमीकंडक्टर प्रकल्पाचे २२ प्रस्ताव मंजूर.**
3. **९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं ज्येष्ठ लेखिका डॉ.मृदुला गर्ग यांच्या हस्ते सातारा इथं उद्घाटन.**
4. **मराठी विज्ञान परिषदेचे जीवन गौरव पुरस्कार यंदा डॉ.टेस्सी थॉमस आणि डॉ. गगनदीप कांग यांना जाहीर.**

उमेदवारी अर्ज

राज्यातल्या महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत आज दुपारी तीन वाजता संपली. उद्या निवडणूक चिन्हाचं वाटप झाल्यानंतर अंतिम उमेदवार यादी जाहीर होईल. येत्या १५ जानेवारीला मतदान तर १६ जानेवारीला मतमोजणी होणार आहे. दरम्यान, काही ठिकाणचे अर्ज बाद झाल्यानं काही उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. तर अनेक ठिकाणी उमेदवारांना प्रतिस्पर्धी न उरल्यानं त्यांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला आहे. अनेक ठिकाणी मुळातच एकमेव अर्ज आले होते, तर काही ठिकाणी छाननीत इतर अर्ज बाद झाल्यानं उमेदवार बिनविरोध आहेत. **मालेगाव** महानगरपालिकेत प्रभाग सहा मध्ये प्रतिस्पर्धी पक्षांचे उमेदवारी अर्ज बाद झाल्याने इस्लाम पार्टीच्या उमेदवार मुनीरा शेख या बिनविरोध निवडून आल्या. **कल्याण डोंबिवली** महानगरपालिकेत शिवसेनेचे तीन आणि भाजपाचा एक उमेदवार बिनविरोध निवडून येणार हे स्पष्ट झालं आहे. त्यामुळे या महानगरपालिकेत बिनविरोध निवडून येणाऱ्या उमेदवरांची संख्या आता आठ झाली आहे. **जळगाव** महानगरपालिकेतल्या प्रतिस्पर्धी उमेदवारांचे अर्ज बाद ठरल्याने प्रभाग क्रमांक १२ ब मधल्या भाजप उमेदवार उज्ज्वला बेंडाळे यांचा बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला आहे. **धुळे** महानगरपालिकेत प्रभाग क्रमांक १७ ब मध्ये दोन अपक्ष उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने भाजपच्या उमेदवार सुरेखा उगले यांची बिनविरोध निवड निश्चित आहे. याआधीच दोन उमेदवार बिनविरोध

निवडले गेल्यामुळे धुळ्यातून भाजपच्या तीन उमेदवारांची बिनविरोध निवड होत आहे.

आढावा बैठक

येणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक अधिकारी तथा अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची सविस्तर आढावा बैठक घेतली.बैठकीत मतदान केंद्रे, मनुष्यबळ, प्रशिक्षण, साहित्य वितरण, मतमोजणी तयारी आणि आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निष्पक्ष आणि शांततेत पार पाडण्याचे स्पष्ट निर्देश देत निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नसल्याच आयुक्तांनी सांगितल.

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव

इलेक्ट्रॉनिक्स भाग उत्पादन योजनेच्या तिसऱ्या टप्प्यात केंद्र सरकारने २२ नवीन प्रस्ताव मंजूर केले असून नवीन वर्षात देशामध्ये ४ नवे सेमिकंडक्टर उत्पादन प्रकल्प सुरु होत असल्याची घोषणा इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज केली. यासंबंधात नवी दिल्लीत आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात आज ते बोलत होते. हे प्रकल्प महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, कर्नाटक, हरयाणा, मध्य प्रदेश आणि राजस्थान या राज्यांमध्ये सुरु होणार असून यामधून सुमारे ३४ हजार रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

विकसित भारत/ विज्ञान

गेल्या एका वर्षात भारताने विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण प्रगती साधली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टर, अंतराळ संशोधन, अणुऊर्जा तसेच खनिज क्षेत्रात देशाने आपली क्षमता ठळकपणे सिद्ध केली आहे. या संदर्भातील सविस्तर माहिती आता जाणून घेऊया...

***मानवकेंद्रित कृत्रिम बुद्धिमत्तेला चालना देण्यासाठी भारताने इंडिया एआय मिशनची घोषणा करत १० हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक जाहीर केली आहे. पुढील आर्थिक वर्षात देशभरात एआय आधारित पायाभूत सुविधा विस्तारण्याचे धोरण आखण्यात आले आहे. सध्या भारताची राष्ट्रीय संगणकीय क्षमता ३८ हजारांहून***

*अधिक जीपीयूवर पोहोचली आहे. सेमीकंडक्टर क्षेत्र भारताच्या तांत्रिक स्वावलंबनाचा कणा बनत असून मे महिन्यात ३ नॅनोमीटर चिप डिझाइनसाठी दोन महत्त्वाचे प्रकल्प सुरू करण्यात आले. स्मार्टफोन, लॅपटॉप तसेच उच्च कार्यक्षम संगणकांसाठी आवश्यक असलेल्या या चिप्स अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे प्रतीक आहेत. याच पार्श्वभूमीवर सेमीकॉन इंडिया २०२५ परिषद आयोजित करण्यात आली, ज्यात भारताची पहिली स्वदेशी ३२-बिट्स 'विक्रम' चिप पंतप्रधानांसमोर सादर करण्यात आली. (आकाशवाणी बातम्यांसाठी नागपूरच्या वृत्त विभागातून मी नम्रता फलके)*

विजय वडेट्टीवार

एमपीएससीमार्फत होणाऱ्या पोलीस उपनिरीक्षक भरतीत वयोमर्यादेमुळे हजारो उमेदवार अपात्र ठरत असल्याने त्यांना दिलासा देण्याची मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून 2025 च्या परीक्षेसाठी सरसकट वयोमर्यादा सवलत देण्याची आग्रही मागणी केली आहे. जाहिरात प्रसिद्ध होण्यास झालेल्या विलंबामुळे विद्यार्थ्यांच वय वाढल असून यात त्यांची कोणतीही चूक नसल्याच वडेट्टीवार यांनी नमूद केल आहे. 2024 मध्ये वयोमर्यादेत सवलत देण्यात आली होती, त्याच धर्तीवर PSI उमेदवारांनाही न्याय देण्याची मागणी त्यांनी केली आहे.

आधारभूत किंमत

शासकीय आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत खरीप पणन हंगाम 2025-26 मधील धान खरेदीकरीता शेतकरी नोंदणीची अंतिम मुदत दि.31 डिसेंबर 2025 पर्यंत देण्यात आलेली होती. परंतु सदर कालावधीत ऑनलाईन शेतकरी नोंदणी पुरेशी न झाल्यामुळे शासनाकडून 31 जानेवारी 2026 पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

सातारा साहित्य संमेलन

सातारा इथं ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं औपचारिक उद्घाटन आज ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉक्टर मृदुला गर्ग यांच्या हस्ते झालं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ज्येष्ठ साहित्यिक, मागच्या वर्षीच्या संमेलन अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर, यावर्षीचे संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ लेखक विश्वास पाटील, स्वागताध्यक्ष मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, साहित्य महामंडळाचे

अध्यक्ष मिलिंद जोशी यावेळी उपस्थित होते. उद्घाटक डॉक्टर मृदुला गर्ग यांनी यावेळी बोलताना, मराठी आणि हिंदी साहित्यात असलेल्या साम्याविषयी माहिती दिली. मराठी भाषेतील दलित आत्मकथनाच्या चळवळीचा त्यांनी विशेषत्वाने उल्लेख केला -

***मराठी माय भाषा के तौर पर नहीं जानती, पर मैं मराठी साहित्य की सदैव से प्रशंसक और रसिक पाठक रही हूँ की मराठी और हिंदी भाषाओं के बीच रस की इतनी समानता है उसमें स्वर, व्यंजन और रस और जो वो लिपी है वो भी हमारी एक है जो मैंने पहली मराठी की पुस्तक पढ़ी थी हिंदी अनुवाद में वो शिवाजी सावंत की मृतुंजय थी। मुझे दलित मराठी साहित्य से एक तरह का विशेष स्नेह रहा है। उसमें उर्मिला पवार और श्रवण कुमार लिंबाले से मेरा मिलना भी हुआ, पड़ना भी हुआ और काफी समय मैंने उनके साथ बिताया भी।***

गावागावातली ग्रंथालयं समृद्ध झाली पाहिजे, असं मत महामंडळाचे अध्यक्ष जोशी यांनी यावेळी व्यक्त केलं. शाळांमध्ये मराठी वगळता इतर भाषा सक्तीची करण्यावर महामंडळाचा विरोध असल्याचंही त्यांनी सांगितलं. आपल्यातली मराठीपणाची ज्योत तेवत ठेवणं महत्वाचं असून, तसं झालं तर भाषा आणि संस्कृतिची काळजी करण्याची गरज उरणार नाही, असं ते म्हणाले. दरम्यान, या संमेलनात आज कविसंमेलन, बाल-कुमार वचाकांशी संवाद, परिसंवाद आणि ‘शिकायला गेलो एक’ या नाटकाचं सादरीकरण होणार आहे.

मराठी विज्ञान परिषद

मराठी विज्ञान परिषदेतर्फे दिले जाणारे जीवन गौरव पुरस्कार आज जाहीर झाले. त्यात डॉ. अनिल काकोडकर जीवनगौरव पुरस्कारासाठी क्षेपणास्त्र क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करणाऱ्या डॉ. टेस्सी थॉमस यांची, तर डॉ. रा. वि. साठे जीवनगौरव पुरस्कारासाठी लस संशोधन कार्यात अग्रेसर असणाऱ्या डॉ. गगनदीप कांग यांची निवड झाली आहे. प्रत्येकी २ लाख ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह आणि सन्मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. पुरस्कार प्रदान समारंभ उद्या मुंबईत आयसीटी, अर्थात रसायन तंत्रज्ञान संस्थेत होणार आहे.

ऑपरेशन थंडर

नागपूर शहर पोलीस दलाच्या वतीने 'ऑपरेशन थंडर' अंतर्गत रविवार, दिनांक २५ जानेवारी रोजी 'टायगर रन २०२६' या जनजागृती उपक्रमाच आयोजन करण्यात आल आहे. पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र सिंगल यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या उपक्रमाचा मुख्य संदेश "Run from Drugs, Run towards Life" असा आहे. मागील वर्षी १५,००० पेक्षा अधिक नागरिकांच्या सहभागामुळे या उपक्रमाला मोठ यश मिळाल होत.

प्यारे खान

बॉलीवूड अभिनेता शाहरुख खान याने आयपीएल मध्ये बांगलादेशी खेळाडूंना घेऊ नये यासाठी आपण त्यांना पत्र लिहिणार असल्याची माहिती राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी नागपुरात प्रसार माध्यमांशी बोलताना दिली. बांगलादेश मध्ये हिंदू अल्पसंख्यांकावर अत्याचार चालू आहेत या संदर्भात आपण भारताचे अल्पसंख्यांक मंत्री किरेण रिजीजू यांना सुद्धा पत्र लिहिणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

हवामान

विदर्भात भंडारा जिल्ह्यात आज सर्वात कमी १० अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली असून, त्या पाठोपाठ गोंदिया इथं ११.२, गडचिरोली इथं १२.२ तर नागपुरात १२.७ अंश सेल्सिअस इतकं किमान तापमान नोंदवण्यात आलं.

*****